**पाहिजेत**

**ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत**

नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.

संपर्क - 9923155996



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**व्यवसाय**

**आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?**


आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!

निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही

संपर्क : 8087459854



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २७० वा | शनिवार, दि. ०६ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती मिळणार

## जरांगेंच्या मागणीला यश



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य सरकारने मराठा समाजासाठी महत्त्वाचा शासन निर्णय काढला आहे. आता मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे (OBC) सर्व शैक्षणिक सवलती मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय सरकारने शुक्रवारी काढला आहे. आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी नुकतेच उपोषण आंदोलन केले होते. या आंदोलनात ही मागणी होती. ही मागणी सरकारने त्वरीत मंजूर केल्याने जरांगे यांच्या आंदोलनाला यश आले आहे.

हा शासन निर्णय यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून लागू होणार आहे.

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील उपोषण केले होते. 58 लाख कुणबी नोंदींचे दस्तावेज मनोज जरांगे यांच्याकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया वेगाने राबवली जाणार आहे. जात पडताळणी प्रक्रियेतील अडचणी दूर करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पुढील 15 दिवसांत बैठक घेणे, न्यायमूर्ती शिंदे समितीला आणखी एका वर्षाची मुदतवाढ देण्यात येणार असून सातारा गॅझेटच्या प्रश्नावर सरकारला आणखी एक महिन्याचा अवधी देण्यात आला होते. तसेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी ओबीसीसारख्या शैक्षणिक सवलती देण्याची मागणी जरांगे यांनी आंदोलनात केली होती.

### सवलत योजनांची अंमलबजावणी कशी होणार कुठे फायदा होणार?

राज्यातील इतर मागास प्रवर्ग प्रवर्गात लागू असलेली शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील लागू होणार आहे. मागास प्रवर्ग उमेदवारांसाठी लागू असलेली मोटार वाहन चालक व वाहन प्रशिक्षण योजना, नियोजन विभागाने सारखी संस्थेमार्फत राबविण्यात यावी. इतर मागासवर्ग प्रवर्गातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली शिष्यवृत्ती योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील लागू करण्यात येणार आहे. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांकरिता व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विकास विभागाने राबवावी. अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर 16 बाबींबाबतची प्रतिपूर्ती करण्याबाबतची योजना, मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लागू करण्यात येणार आहे.

परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या व इतर मागास वर्ग प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू असलेली योजना मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील लागू होणार आहे. मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणि सवलती व सोयी सुविधा मिळविण्यासाठी पात्र असलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी, मराठा समाजातील विद्यार्थी देखील या शैक्षणिक सवलती व सोयी सुविधा मिळण्यासाठी पात्र असणार आहेत.

**मराठा समाजासाठी या योजना सुरू होणार**

1. शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना
2. मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना
3. माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली शिष्यवृत्ती योजना
4. विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींबाबतची प्रतिपूर्ती करण्याबाबतची योजना
5. महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे व परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी लागू असलेली योजना
6. ओबीसी विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती व सोयी सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी ही पात्र असतील.
7. ओबीसी विद्यार्थ्यांनी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिया (CAP) पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावर प्रवेश घेतलेल्या इतर मागास वर्ग प्रवगार्तील विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक सवलती लागू करण्यात याव्यात.
8. ज्या शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा इतर मागास प्रवर्गास लागू करण्यात आल्या असतील अथवा भविष्यात लागू करण्यात येतील, त्या सर्व शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा पुढील आदेशापर्यंत मराठा समाजास आपोआप लागू होतील.

# आषाढी यात्रा; पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी गतवर्षीपेक्षा दीडपट सुविधेत वाढ - जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 25 जुलै 2026 रोजी होणार असून, आषाढी यात्रेसाठी पूर्वीच पालखी मार्ग, तळ आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख, विश्वस्तांकडून काही मागण्या व सूचना करण्यात आलेल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून 80 टक्के कामे पूर्णत्वाकडे येत आहेत. आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यांसोबत येणाऱ्या दिंड्या व भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भाविकांना तात्काळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी तसेच पंढरपूरमध्ये गतवर्षीपेक्षा दीडपट अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सांगितले.

आषाढी यात्रेच्या पूर्वतयारीबाबत केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुख यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल



जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. म्हणाले, आषाढी वारीच्या अनुषंगाने वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाकडून विविध कामे करण्यात येतात. विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्याने काही कामांच्या निविदाबाबत निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी निवडणूक आयोगाकडून मिळालेली आहे. त्यामुळे आवश्यक सर्व कामे पालखी सोहळे जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी करण्यात येणार आहेत.

पालखी तळाच्या ठिकाणी मुरमीकरण करण्यात येणार आहे. वाढीव पालखी तळाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. पालखी मार्गावर व तळांवर सुलभ शौचालय, स्नानगृह, वॉटरप्रूफ मंडप, रुग्णवाहिका आदींची संख्या वाढविण्यात येणार आहे.

पालखी मार्गावरील पेट्रोल पंपांवर सोहळ्यासोबत येणाऱ्या वाहनांना पेट्रोल/डिझेल उपलब्ध होण्यासाठी संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात येणार असून गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घेण्यात येईल.

भाविकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. आषाढी यात्रा सोहळा कालावधीत पालखी सोहळ्यासह वारकरी भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता प्रशासनाकडून घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन म्हणाले, पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी जर्मन हँगरच्या सुविधेत वाढ करण्यात येणार असून, पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोडी तसेच घोडे यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल. पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पालखी सोहळे संबंधित मुक्कामाच्या ठिकाणावरून पुढे गेल्यानंतर तात्काळ स्वच्छता करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या पूर्णिमेला श्री विठ्ठलरुक्मिणी मंदिरात दाखल होतात आणि सर्व संतांच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात येतात. यावेळी संत देव भेट सोहळ्याला होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रथा-परंपरेनुसार योग्य नियोजन करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

यावेळी बैठकीत मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुख यांनी पुढील सूचना केल्याः पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने काही ठिकाणी पालकी तळ कमी पडत आहेत; त्यामुळे ते तळ वाढवून देण्यात यावेत. पालखी सोहळ्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. टँकरची संख्या वाढवावी. पालखी सोहळे पालखी मार्गावरून जात असताना वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे. तसेच पालखी तळांवर मुरमीकरण करावे.

गतवर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सोयी-सुविधांबाबत पालखी सोहळा प्रमुखांनी समाधान व्यक्त केले.

# यावर्षीची आषाढी वारी यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी सर्व विभागांनी टीम म्हणून काम करा - शितल तेली उगले

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारी 2026 यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रमुखानी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. वारकरी, भाविकांना मागील वर्षीच्या वारीपेक्षा यावर्षीच्या वारीत अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी सर्व विभागांनी एक टीम म्हणून काम करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त शितल तेली -उगले यांनी केले.

येथील केपीबी महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित आषाढी वारी 2026 अनुषंगाने आढावा बैठकीत श्रीमती तेली - उगले मार्गदर्शन करत होत्या.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर आयुक्त तुषार ठोंबरे, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ औसेकर महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तसेच संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



विभागीय आयुक्त शितल तेली उगले पुढे म्हणाल्या की, आषाढी वारी पालखीतळ, विसावा व मुक्कामाची ठिकाणे, पालखी मार्ग ज्या ग्रामपंचायती व नगरपालिकेच्या हद्दीत आहेत त्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी पालखी पुढे गेल्यानंतर पुढील चार ते पाच तासात त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली गेली पाहिजे. तसेच या ठिकाणी वारकऱ्यांना पिण्याचे उच्च वर्ष ते पाणी मिळाले पाहिजे. तसेच या ठिकाणी कायमस्वरूपी व तात्पुरती शौचालये दिवसातून किमान तीन ते चार वेळेस स्वच्छ केली पाहिजे, यासाठी पुरेसे मनुष्यबाण संबंधित यंत्रणांनी ठेवले पाहिजे तसेच या ठिकाणी प्रकाशव्यवस्था, अग्नि प्रतिबंधक व्यवस्था, आरोग्य पथके व्यवस्था योग्य पद्धतीने ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले.

आरोग्य यंत्रणेने वारी कालावधीत येर्णाया सर्व भाविकांना व वारकऱ्यांना विटामिन ए व विटामिन डी च्या टॅबलेट शंभर टक्के पुरवठा करावा. वारी कालावधीत कोणत्याही अधिकारी कर्मचारी यांनी राजा घेऊ नये, त्यांच्या वरिष्ठांनी त्यांच्या राजा मंजूर करू नयेत. त्याप्रमाणेच या कालावधीत कोणीही आपला मोबाईल बंद ठेवू नये, अन्यथा अशा अधिकारी कर्मचाऱ्या विरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देशही आयुक्त श्रीमती तेली यांनी दिले.

वारी कालावधीत सुविधा देत असताना फिल्डवरील अधिकाऱ्यांनी अधिक गतिमान पद्धतीने काम करणे अपेक्षित आहे. काही ठिकाणी पालखीतळ हायवे पासून आत मध्ये आहे त्या ठिकाणी जिल्हा परिषद बांधकाम विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांनी त्या ठिकाणी पालख्या दिंड्या वारकरी जाण्यासाठी जोड रस्ता तात्काळ तयार करून द्यावेत. वारीकाळात उजनी धरणातून पाणी सोडण्याबाबत योग्य नियोजन करावे. वाळवंटा नदीच्या दोन्ही बाजूला दोन-तीन वाजता वर उभा करावेत व नदीपात्रात जाणाऱ्या भाविकांवर योग्य नियंत्रण ठेवावे. पोलीस विभागाने गर्दीवर नियंत्रणासाठी काळजी घ्यावी. पुरेसा बंदोबस्त ठेवावा, सर्व संबंधित विभागाने त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश आयुक्त श्रीमती तेली यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आषाढी वारीच्या अनुषंगाने प्रशासनाने केलेल्या कामाची माहिती दिली. यावर्षी सीसीटीव्ही च्या माध्यमातून या वापरून हेड काउंटिंग करण्यात येणार आहे. तसेच मल्टी ड्रोन वापर करून सुरक्षा यंत्रणा तसेच हेड काउंटिंगही करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने दहा दिवस अगोदर तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून अन्न व धान्याचे तसेच प्रसादाचे नमुने घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी गटविकास अधिकारी अमोल जाधव, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तर मंदीर समितीचेकार्यकारी अधिकारीराजेंद्र शेळके यांनी वारीच्या अनुषंगाने त्यांनी केलेल्या नियोजनाची माहिती बैठकीत सादर केली.

# अ.भा. मराठी चित्रपट महामंडळासाठी रविवारी मतदान

## बदलासाठी मत देण्याचे महामंडळ बचाव अपक्ष संघाचे सभासदांना आवाहन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या संचालक पदाच्या १४ जागांसाठी रविवारी दि. ७ जून रोजी राज्यभर मतदान होणार असून सत्ताधारी पॅनलविरोधात महामंडळ बचाव अपक्ष संघ - तिसरी आघाडी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्याची माहिती आघाडीचे उमेदवार उल्हास नांद्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निवडणुकीसाठी राज्यभरातील सुमारे ३ हजार ४०० सभासद मतदानाचा हक्क बजावणार आहेत. सोलापुरातील मतदान सरस्वती मंदिर येथे होणार असून शहर व जिल्ह्यातील सुमारे १५० सभासद मतदान करणार आहेत. महामंडळात भ्रष्टाचारमुक्त, तंटामुक्त आणि सभासदकेंद्रित कारभार निर्माण करण्याच्या उद्देशाने 'महामंडळ बचाव अपक्ष संघ - तिसरी आघाडी' स्थापन करण्यात आल्याचे नांद्रे यांनी सांगितले. निवडणुकीनंतरही सभासदांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले, महामंडळातील गेल्या काही वर्षातील भ्रष्टाचार, अंतर्गत वाद, न्यायालयीन प्रकरणे आणि अपारदर्शक कारभारामुळे सभासदांचा विश्वास कमी




झाला आहे. हे चित्र बदलण्यासाठी पारदर्शक, लोकाभिमुख आणि विश्वासार्ह महामंडळ उभे करण्याचा आमचा प्रयत्न आहे. महामंडळ हे काही मोजक्या व्यक्तींचे नसून सर्व सभासदांचे आहे, या भावनेतून आम्ही निवडणूक लढवत आहोत.

या आघाडीत सर्व अपक्ष उमेदवारांचा समावेश असून कोणत्याही मोठ्या पॅनलच्या दबावाखाली न राहता सक्षम पर्याय देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सर्व उमेदवार चित्रपटसृष्टीत दीर्घकाळ कार्यरत असून सभासदांच्या समस्या प्रत्यक्ष अनुभवलेल्या व्यक्ती असल्याचेही त्यांनी सांगितले.

आघाडीतर्फे अमोल भावे (दिग्दर्शक विभाग), अवधूत जोशी (दिग्दर्शक विभाग), शरद लोणकर (प्रसिद्धी विभाग), मानसिंग कदम (निमार्ता विभाग), संतोष शिंदे (अभिनेता विभाग), मनोज मराठे (निर्मिती व्यवस्था विभाग), महादेव शिरोळकर (निर्माता विभाग) आणि उल्हास भालचंद्र नांद्रे (कलादिग्दर्शक विभाग) हे उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

या पत्रकार परिषदेला अमोल भावे, महादेव शिरोळकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**अपक्ष संघाचा सभासदकेंद्रित वचननामा**

महामंडळ बचाव अपक्ष संघाने सभासदांसाठी विविध आश्वासने जाहीर केली आहेत. त्यामध्ये प्रत्येक सभासदाला मतदानाचा हक्क व अद्ययावत सभासद यादी, सर्व सेवा पूर्णपणे ऑनलाइन करणे, तत्काळ सभासद कार्ड वितरण, बोर्ड बैठकींचे थेट प्रक्षेपण, वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे थेट संवाद, कलाकार, तंत्रज्ञ व कामगारांना जलद न्याय आणि आर्थिक मदत, वैद्यकीय व शैक्षणिक सहाय्य, सर्व सभासदांसाठी विमा योजना, १५ वर्षांहून जुने घरविहीन सभासदांसाठी घरकुल योजना, महाराष्ट्रभर प्रवास सवलत, मानधनवाढीसाठी प्रयत्न, मालिका क्षेत्रातील थकीत देयके वेळेत मिळवून देणे, फिरते सिनेमागृह योजना, वयोवृद्ध कलाकारांच्या पेन्शनमध्ये वाढ तसेच निराधार कलाकारांसाठी 'कलावंतनगर' आश्रम संकल्पना यांचा समावेश आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बी. नारायणा फाऊंडेशनतर्फे वृक्षारोपण

## 'एक झाड माझ्या नावाचं' संकल्पातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त बी. नारायणा फाऊंडेशनच्या वतीने परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांमध्ये वृक्षलागवडीबाबत जनजागृती करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शंकर बटगिरी होते. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी वृक्षलागवड ही आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे सांगितले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि घटणारे हरित क्षेत्र यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असून प्रत्येक नागरिकाने "एक झाड माझ्या नावाचं" हा संकल्प करून किमान एक तरी वृक्ष लावावा आणि त्याचे संगोपन करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच वृक्षारोपणातून परिसर हिरवागार करण्यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सोसायटीचे सचिव दिनकर नारायणकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. केवळ वृक्षारोपण करून थांबणे पुरेसे नसून लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन, पाणीपुरवठा आणि संरक्षण करणे तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. वृक्ष संवर्धनातूनच पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट साध्य होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि हरित उपक्रमांबाबत उपस्थितांमध्ये जनजागृती करण्यात आली. विशेष म्हणजे सोसायटीतील लहान मुले आणि तरुणांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षारोपण केले.

या प्रसंगी नरसिंग म्हंता, निखिल बटगिरी, संजीव सानी, मनिष बटगिरी, सागर बटगिरी, अनिल कुलकर्णी, रेवप्पा काळे, दिनकर नारायणकर, मल्लिनाथ अचलेरकर, विठ्ठल पवार, कलशेट्टी, सुनिल भैरामडगी, साईनाथ रसोलगीकर, सुनिल शिंदे, ईश्वर लोकरे यांच्यासह सोसायटीतील नागरिक, महिला, युवक आणि बालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला असून, भविष्यातही अशाच प्रकारचे सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्याचा निर्धार बी. नारायणा फाऊंडेशनच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# ६०० मतदारांची अदृश्य शक्ती आमच्या पाठीशी; खा. धैर्यशील मोहिते-पाटलांचा दावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीत राजकीय वातावरण तापले असून, महाविकास आघाडीचे उमेदवार वसंतराव देशमुख यांच्या उमेदवारीमागे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्वतोपरी पाठबळ असल्याचा दावा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी केला आहे.

'आमच्याकडे १६ मतं आहेत का, असा प्रश्न विरोधक विचारत असतील तर मी १६ मतांपासून सुरुवात करतो. मात्र ६०० मतदारांची अदृश्य शक्ती आमच्या पाठीशी आहे,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सोलापुरात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना खा. मोहिते-पाटील



म्हणाले की, पक्षप्रमुख शरद पवार यांच्या स्पष्ट आदेशानुसार वसंतराव देशमुख यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यात आले आहे. ही लढत केवळ एका उमेदवाराची नसून पुरोगामी विचारांची आहे. महाविकास आघाडी भाजपविरोधात एकसंघपणे मैदानात उतरली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निवडणूक बिनविरोध व्हावी, असे आवाहन केल्याचा उल्लेख करताना मोहिते-पाटील म्हणाले की, हे आवाहन आम्हाला केवळ माध्यमांतूनच समजले. प्रत्यक्षात कुणीही आमच्याशी संपर्क साधला नाही किंवा चर्चा केली नाही. संवाद झाला असता तर चित्र वेगळे असू शकले असते, असेही त्यांनी नमूद केले.

लोकशाहीत प्रत्येकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार असल्याचे सांगत त्यांनी, ही हुकूमशाही नाही. आम्ही निवडणूक लढवायची नाही का? असा सवाल उपस्थित केला. पक्षांतर्गत मतभेद असतील तर ते घरच्या घरी सोडवले जातील. घरातील विषय चव्हाट्यावर मांडण्याची आमची परंपरा नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वसंतराव देशमुख हे सुधाकरपंत परिचारक आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली घडलेले कार्यकर्ते असल्याचे सांगत, त्यांनी स्मृतीस्थळावर जाऊन आशीर्वाद घेतल्याचे मोहिते-पाटील यांनी सांगितले. आमच्यामागे महाविकास आघाडीतील कोणकोणत्या शक्ती आहेत, हे निकालाच्या दिवशी सर्वांना दिसेल, असे सूचक विधानही त्यांनी केले.

## संपादकीय

# दुहेरी आरोग्य संकट

भारताने पूर्वीच्या कुपोषण, माता आरोग्य आणि बालकांच्या आरोग्य क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. पूर्वी सरासरी आयुर्मान केवळ ३५ ते ४० वर्षे इतके होते, मात्र आज वैद्यकीय क्षेत्रातील प्रगती, डॉक्टरांचे प्रयत्न आणि विविध रोगांवरील प्रभावी औषधांमुळे ते वाढून सुमारे ७० वर्षांपर्यंत पोहोचले आहे; काही व्यक्तींचे आयुर्मान ८० ते ९० वर्षांपर्यंतही दिसून येते. राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण २०२३-२४ च्या अहवालानुसार बालकांचे कुपोषण आणि मातांच्या आरोग्य स्थितीत सकारात्मक सुधारणा झाल्याची नोंद आहे. तथापि, वाढता लठ्ठपणा आणि मधुमेहाचे वाढते प्रमाण हे नव्या सार्वजनिक आरोग्य आव्हानांपैकी ठरत आहे. या सर्वेक्षणानुसार १४ ते ४९ वयोगटातील महिलांमध्ये ओव्हरवेट आणि लठ्ठपणाचे प्रमाण ३०.७ टक्क्यांपर्यंत वाढले आहे, जे पूर्वीच्या अहवालात २४ टक्के होते. पुरुषांमध्येही हे प्रमाण वाढून २७.३ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. हीच प्रवृत्ती भारतातील बहुतांश राज्यांमध्ये दिसून येते. उदाहरणार्थ, गोव्यात महिलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण ४५.१ टक्के इतके उच्च आहे. यावरून स्पष्ट होते की भारतात आज 'दुहेरी आरोग्य संकट'निर्माण झाले आहे. एकीकडे कुपोषणाचे आव्हान कमी होत असताना दुसरीकडे जीवनशैलीशी संबंधित आजार झपाट्याने वाढत आहे. भारताच्या एका भागात अजूनही कुपोषणाचे गंभीर संकट आहे, तर दुसरीकडे लठ्ठपणा (ओबेसिटी) हे लोकांच्या आरोग्यासमोर मोठे आव्हान बनत आहे.

एकीकडे अंडरन्यूट्रिशन म्हणजेच कुपोषण हे भारतासमोरचे महत्त्वाचे प्रश्न आहे, तर दुसरीकडे चुकीच्या आहाराच्या सवयी आणि अस्वस्थ जीवनशैलीमुळे मधुमेहासारख्या आजारांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. आंध्रप्रदेशमध्ये लठ्ठपणाचे सर्वाधिक प्रमाण आढळले असून, तेथे ४७.९ टक्के महिला या ओव्हरवेट किंवा लठ्ठ वर्गात मोडतात. यावरून स्पष्ट होते की भारतासमोर आता दुहेरी आव्हान उभे आहे-एकीकडे कुपोषणाची समस्या आणि दुसरीकडे वाढता ओव्हरवेट व लठ्ठपणा. त्याचबरोबर, मुलांच्या कुपोषणाच्या स्थितीत मात्र लक्षणीय सुधारणा दिसून येत आहे, ही एक सकारात्मक बाब आहे. ज्या मुलांमध्ये स्टंटिंग (खुरटलेली वाढ) आढळते, त्यांचे प्रमाण या सर्वेक्षणानुसार ३५.५ टक्क्यांवरून २९.३ टक्क्यांपर्यंत घटले आहे. ही केवळ आकडेवारी नसून एक सकारात्मक बदल दर्शवते. खुरटलेली वाढ असलेल्या मुलांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली, म्हणजेच क्रॉनिक कुपोषणापासून अधिक मुले मुक्त झाली. यामागे अनेक कारणे आहेत. मातांच्या आरोग्यस्थितीत सुधारणा झाली असून आयर्न-फॉलिक ॲसिड गोळ्यांचे नियमित सेवन वाढले आहे. तसेच रुग्णालयांमध्ये प्रसूतीचे प्रमाणही लक्षणीयरीत्या वाढले.

मुलांच्या लसीकरणाचे प्रमाण ७६.६ टक्क्यांवरून ८२.६ टक्क्यांपर्यंत वाढले. या सुधारणांमागे सरकारी कल्याणकारी योजना, आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेली सुधारणा तसेच वाढते शैक्षणिक आणि सामाजिक जागरूकतेचे वातावरण ही प्रमुख कारणे आहेत. पूर्वी शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी असल्यामुळे आरोग्य आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत पुरेशी जागरूकता नव्हती. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. आजच्या विकसित होत असलेल्या भारतात लोक अधिक जागरूक झाले आहेत आणि सरकारही विविध योजना प्रभावीपणे राबवत आहे. माता व बाल आरोग्याबाबत जनजागृती वाढली असून स्वच्छता सुविधांमुळे आरोग्यावर सकारात्मक परिणाम दिसतो. स्वच्छ भारत अभियान, जल जीवन मिशन आणि वीजपुरवठा सुधारणा यांसारख्या उपक्रमांमुळे पायाभूत सुविधा मजबूत झाल्या आहेत.महिलांच्या आरोग्य व सक्षमीकरणातही महत्त्वपूर्ण प्रगती झाली आहे. महिला अधिक शिक्षित, स्वावलंबी आणि सक्षम झाल्या असून त्याचा सकारात्मक परिणाम सामाजिक व आर्थिक स्थितीवर दिसतो. लोकसंख्या नियंत्रण व कुटुंब कल्याण क्षेत्रातही सुधारणा झाली असून आधुनिक गर्भनिरोधक साधनांच्या उपलब्धतेमुळे एकूण प्रजनन दरात घट झाली आहे.तथापि, ही प्रगती अजून पूर्ण समाधानकारक नाही; काही क्षेत्रांमध्ये पुढील सुधारणा आवश्यक आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या अहवालानुसार कुपोषणाच्या समस्येत काही सुधारणा झाल्या असल्या तरीही महिला व बालकांच्या आरोग्याशी संबंधित काही गंभीर प्रश्न अद्याप कायम आहे. विशेषतः बालकांमधील खुंटलेल्या वाढीच्या समस्येत घट झाली असली तरी ती पूर्णपणे दूर झालेली नाही. दुसरीकडे, लठ्ठपणाही चिंताजनक समस्या बनली आहे. महाराष्ट्रात सुमारे ३१.१% महिला या समस्येचा सामना करत आहे, तर नागरी भागात हे प्रमाण सुमारे ४०.१% पर्यंत पोहोचते. बीएमआय २५ किंवा त्याहून अधिक असणे हे हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल आणि यकृताशी संबंधित आजारांना आमंत्रण देते. त्यामुळे लठ्ठपणा हा केवळ सौंदयार्चा प्रश्न नसून गंभीर आरोग्याचा विषय आहे. गेल्या काही वर्षांत या समस्येची प्रमुख कारणे म्हणजे बदललेली जीवनशैली, अपुरी शारीरिक हालचाल, असंतुलित आहार आणि शहरीकरणामुळे वाढलेला ताण. विशेषतः शहरी भागातील प्रौढ व महिलांमध्ये व्यायामाच्या सवयी कमी झाल्या, हे एक महत्त्वाचे कारण आहे.

म्हणूनच, या सर्व सकारात्मक बदलांसोबतच वाढत्या आरोग्य समस्यांकडेही तितक्याच गांभीयार्ने लक्ष देणे आवश्यक आहे. संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि आरोग्यदायी जीवनशैली यावर भर देऊन लठ्ठपणासारख्या समस्यांवर नियंत्रण मिळवणे अत्यावश्यक आहे. दक्षिणेकडील राज्यांमध्ये लठ्ठपणाची समस्या अधिक तीव्र झाली असून ती केवळ शहरी भागापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ग्रामीण भागातही वाढताना दिसते. महाराष्ट्रातही ग्रामीण व शहरी दोन्ही भागांत लठ्ठपणा ही केवळ महिलांची नव्हे, तर पुरुषांचीही महत्त्वाची समस्या बनली आहे. हे बदल जीवनशैलीतील फरक दर्शवतात. विकसित देशांमध्ये बैठे काम अधिक असल्याने शारीरिक हालचाल कमी होते आणि हाच ट्रेंड आता भारतातही दिसू लागला आहे. अहवालातून एक सकारात्मक बाब समोर आली आहे. महिलांमधील कुपोषणाचे प्रमाण मागील वर्षांच्या तुलनेत कमी झाले आहे. तसेच कोविडनंतर लसीकरणाबाबत लोकांचा विश्वास वाढल्याचेही दिसते. एकूणच, हा अहवाल बदलत्या आरोग्य परिस्थिती आणि जीवनशैलीतील बदल अधोरेखित करतो.

# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी



छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला.त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी, कुपोषण यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सवोतीपरी प्रयत्न केले पाहिजे.त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे "भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा" यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवासाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दुःखात सहभागी व्हायला पाहिजे. १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व, त्यांचा त्याग, रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते. ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे "राज्याभिषेक सोहळा"घराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे.आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार, महागाई याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे. आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे. शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यत पोहचलेच पाहिजे. जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात. १९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास, तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर व इतिहास आहे. कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते. गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती.आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीवार्दाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले. अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले.अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले. हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा. यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे.यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदुषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील. शिवरायांना माझा मानाचा मुजरा.

जय शिवाजी.
हर हर महादेव.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावून संवर्धन करणे आवश्यक - संस्कृती सातपुते

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि भावी पिढीला सुरक्षित व आरोग्यदायी आयुष्य देण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते यांनी व्यक्त केले.

त्या सोलापूर जिल्हा परिषद येथे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होत्या. त्या पुढे बोलत असताना



म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'एक पेड़ माँ के नाम 'या अभियानातून प्रेरणा घेऊन सोलापूर जिल्हा परिषद येथे वृक्षारोपण केले आहे. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजित पवार, समाज कल्याण सभापती संस्कृती सातपुते, शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार-सावंत, कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती रामप्पा चिवडशेट्टी, महिला व बालकल्याण सभापती अमृताताई वाघे, जिल्हा परिषद सदस्य सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांच्यासह सर्व मान्यवर वर्ग अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## शिवराज्यभिषेक

शिवरायांनी रायरेश्वराला रक्ताचा अभिषेक घातला,
शपथविधी पार पडला... !
शेकडो वर्षानंतर धर्माला समान वागवनारा...
प्रजेला न्याय व सुख देणारा या महाराष्ट्राला असा राजा लाभला... !
राज्यभिषेकाचा दिवस उजाडला सोन्याचा चौरंग
महाराज बसण्याची वाट पाहत होता...
तुप,दही, मध यांचे कलश, छत्र - चामर अशी एक एक वस्तू
महाराजांकडे जाण्यासाठी पुढे येत होती...
गंगा, सिंधू, गोदावरी, यमुना, कृष्णा, नर्मदा, कावेरी सप्त नदयांचे पाणी,
महाराजांच्या मस्तकावर पडण्यासाठी घागरीतून पुढे सरसावत होते...
सोन्या -मोत्याच्या झालरीचे छत्र महाराजांच्या डोक्यावर धरले...
एक एक मोती जिरेटोपात कोरले,
त्यात स्वाभिमान, शोर्याचे तुरे सजले...
३२ मन सोन्याच्या सिंहासनावर बसून शिवशासन चालवणारे
"शककर्ते राजे" "शिवछतापती महाराज" आम्हा लाभले... !

**- मयुरी विश्वनाथ बाबर**
(9112443343)

# व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** व्ही.व्ही.पी. अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन आणि शाश्वत विकासाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आयआयटी मुंबईचे संशोधक डॉ. अनुज घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्राचार्य व कॅम्पस संचालक डॉ. अरुण गायकवाड होते. यावेळी आय.ई.आय. सोलापूर चॅप्टरचे सचिव ओमप्रकाश दरक, संस्थेचे संचालक रोहन देशमुख, व्ही.व्ही.पी. पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. एस. एन. कुलकर्णी, व्ही.व्ही.पी. ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य प्रा. संतोष माने तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. संजय बुगडे यांनी प्रास्ताविकातून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रा. मकरंद बुध्दे यांनी प्रमुख पाहुणे डॉ. अनुज घोरपडे यांचा परिचय करून दिला. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. अनुज घोरपडे, आय.



ई.आय. सोलापूर चॅप्टरचे सचिव ओमप्रकाश दरक, संस्थेचे सचिव रोहन देशमुख तसेच इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी रोहन देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी वैयक्तिक स्तरावर जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन केले. ओमप्रकाश दरक यांनी शाश्वत विकासासाठी पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याची गरज व्यक्त केली.

डॉ. अरुण गायकवाड यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालय परिसरात १०० हून अधिक वृक्ष लागवड करण्याचा संकल्प व्यक्त करत विद्यार्थ्यांनीही पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. तसेच वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

डॉ. एस. एन. कुलकर्णी यांनी पर्यावरण संरक्षणासाठी जनसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, जलसंवर्धन, स्वच्छता, पुनर्वापर , वापरात कपात आणि पुनर्चक्रण यांसारख्या पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असे त्यांनी नमूद केले.प्रमुख पाहुणे डॉ. अनुज घोरपडे यांनी पर्यावरणीय आव्हाने, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाबाबत मार्गदर्शन करताना पर्यावरण संरक्षणामध्ये तरुण पिढीची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गोडुगुपल्ली यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. संतोष माने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. संजय बुगडे तसेच सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष अमोल (नाना) चव्हाण, संस्थापक चेअरमन डॉ. जी. के. देशमुख तसेच व्हाईस चेअरमन मधुकर कटकधोंड यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले

# सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते सभासद स्मार्ट कार्डाचे वितरण



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर- अकलूज या साखर कारखान्याच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज शुक्रवार दि.०५/०६/२०२६ रोजी शेती विभागीय कार्यालय, लवंग येथे वृक्षारोपण, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (ए. आय.), ऊस शेती चर्चासत्र व सभासद स्मार्ट कार्ड वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी सदरचा कार्यक्रम अकलूज नगरपरिषदेचे नगरसेवक तथा संचालक सयाजीराजे मोहिते पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाला.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते-पाटील माजी उपमुखमंत्री, महाराष्ट्र राज्य व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर चालू आहे.

सयाजीराजे मोहिते- पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना पर्यावरणाचे संरक्षणाकरिता लोकांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले.

शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (ए.आय.) या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कमीत कमी खर्चामध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेणे ही काळाची गरज असल्याचे सांगून कारखान्याने प्रायोगिक तत्त्वावर सभासदांना स्मार्ट कार्डचे वितरण केले असून त्याचे सभासदांना होणारे फायदे, वेळेची बचत, त्वरित माहिती मिळणे याबाबत सभासद व शेतकरी यांना माहिती दिली.

सदर कार्यक्रमास शंकरराव माने-देशमुखसाहेब, व्हॉईस चेअरमन, कारखान्याचे आजी माजी संचालक, डॉ.समाधान सुरवसे व डॉ.तुषार शितोळे, शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे, डॉ.तुषार पोळ, कृषी विज्ञान केंद्र, बारामती, सभासद, शेतकरी, कारखान्याचे कार्यकारी संचालक सुहास यादव व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

## वात्रटिका

### भरोसा उरला नाही

जिंकायचे म्हणून तर
सगळी घडामोड होती...
कुठे समझोता होता
तर कुठे तडजोड होती...
सुरूळीत वाटते तेव्हा
त्यांनी दाखवली खोड...
कट करी कोण आणि
शेवटी झाली फोडाफोड...

**हणमंत पडवळ**
धाराशिव
8698067566

# वादळी वाऱ्यासोबत अदानी सिमेंट कंपनीच्या धुळीचे साम्राज्य

**दौंड (कटूसत्य वृत्त):-** कानगाव परिसरामध्ये आदानी सिमेंट कंपनी व श्री सिमेंट कंपनी या दोन्ही कंपनीचे धुळीचे प्रदूषण होत आहे. त्याचबरोबर ओव्हरलोड वाहतुकीमुळे सुद्धा परिसरातील रस्ते खराब होत आहेत. वेळोवेळी निवेदन देऊनही संबंधित विभागाने अद्यापही या विषयाकडे दुर्लक्ष केले आहे. येणाऱ्या अधिवेशनामध्ये रयत क्रांती संघटनेचे संस्थापक




अध्यक्ष व विद्यमान आमदार सदाभाऊ खोत यांच्यामार्फत या दोन्ही सिमेंट कंपनीच्या प्रदूषणासंदर्भात व ओव्हरलोड वाहतुकी संदर्भात अधिवेशनामध्ये प्रश्न विचारला जाईल व जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत सिमेंट कंपनी विरोधात संघर्ष सुरूच राहील. संबंधित दोन्ही कंपनीच्या विरोधामध्ये आतापर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळ, परिवहन मंडळ, मुख्यमंत्री महोदय यांना निवेदन देण्यात आले असल्याचे राज्य प्रवक्ते भानुदास शिंदे रयत क्रांती संघटना दौंड यांनी सांगितले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# प्लास्टिक मुक्तीसाठी आरसीएफचा स्तुत्य पुढाकार

## अलिबाग परिसरात 'बाटली संकलन बिन्स'चे वितरण

**अलिबाग (कटूसत्य वृत्त)**:- वाढते प्लास्टिक प्रदूषण ही आजच्या काळातील सर्वात मोठी गंभीर समस्या बनली आहे. या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आणि अलिबाग परिसरातील निसर्गरम्य समुद्रकिनारे तसेच सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आर.सी.एफ.) कंपनीने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधत एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. आरसीएफतर्फे अलिबाग तालुक्यात चार मोठ्या आकाराच्या 'बाटली संकलन बिन्स' (Bottle Bins) उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या किहीम, नागाव आणि वरसोली या तीन प्रमुख समुद्रकिनाऱ्यांवर प्रत्येकी एक आणि अलिबाग शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या एस.टी. बसस्थानक परिसरात एक, अशा एकूण चार ठिकाणी या विशेष बिन्स बसवण्यात आल्या आहेत.

**सागरी जीवसृष्टीचे रक्षण आणि सामाजिक उत्तरदायित्व**

अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यांवर आणि सार्वजनिक ठिकाणी पर्यटकांची नेहमीच मोठी वर्दळ असते. या भागात प्लास्टिकच्या बाटल्यांचा कचरा मोठ्या प्रमाणावर साचत असल्याने केवळ परिसराचे सौंदर्यच खराब होत नाही, तर स्थानिक पर्यावरणासह सागरी जीवसृष्टीलाही मोठा धोका निर्माण होतो. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन, आरसीएफने आपल्या सामाजिक उत्तरदायित्व (उरफ) निधीतून हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. कंपनीचा हा पुढाकार पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने अत्यंत दिशादर्शक ठरणारा आहे.

**त्रिसूत्री प्रयत्नातून स्वच्छतेचा संकल्प**

या उपक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये केवळ बिन्सचे वाटप करून जबाबदारी संपवण्यात आलेली नाही, तर त्याच्या व्यवस्थापनाचीही योग्य साखळी तयार करण्यात आली आहे. आरसीएफने या बिन्स उपलब्ध करून दिल्या आहेत, तर त्यामध्ये जमा होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचे नियमित संकलन आणि त्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामपंचायती आणि अलिबाग नगरपालिकेकडे सोपवण्यात आली आहे. आरसीएफ, स्थानिक ग्रामपंचायती आणि नगरपालिका यांच्या या संयुक्त भागीदारीमुळे अलिबाग परिसर स्वच्छ आणि प्लास्टिकमुक्त ठेवण्यास मोठी मदत होणार आहे.

**नागरिकांच्या सहभागाचे आवाहन**

कोणतीही शासकीय किंवा निमशासकीय मोहीम तोपर्यंत यशस्वी होऊ शकत नाही, जोपर्यंत त्याला लोकसहभागाची जोड मिळत नाही. आरसीएफने पर्यावरण रक्षणासाठी पायाभूत सुविधा तर उपलब्ध करून दिल्या आहेत, आता गरज आहे ती नागरिकांच्या आणि पर्यटकांच्या जागरूकतेची. नागरिकांनी प्लास्टिकच्या बाटल्या आणि इतर कचरा उघड्यावर किंवा समुद्रकिनाऱ्यांवर न फेकता, या संकलन बिन्सचा पुरेपूर वापर करावा, असे आवाहन आरसीएफ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. चला, या पर्यावरण दिनी आपणही या मोहिमेत सामील होऊया आणि अलिबागला प्लास्टिकमुक्त करण्याचा संकल्प करूया.

# मुद्रा सन सिटी येथील नागरिकांच्या नाला समस्येची महापौरांनी घेतली दखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- अक्कलकोट रोड येथील मुद्रा सन सिटी परिसरातील रहिवाशांनी नव्याने प्रस्तावित करण्यात येणारा ओपन नाला बंदिस्त स्वरूपात करण्यात यावा, या मागणीसंदर्भात दिलेल्या निवेदनाची आज महापौर विनायक दादा कोंड्याल यांनी प्रत्यक्ष भेट देऊन दखल घेतली.

यावेळी महापौर कोंड्याल यांनी संबंधित परिसराची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. रहिवाशांनी पूर्वी ओपन नाल्यातून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे निर्माण झालेल्या दुर्गंधी,



आरोग्यविषयक समस्या तसेच लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त केली.

नागरिकांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेत महापौर विनायक कोंड्याल यांनी महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा करून सदर नाला बंदिस्त स्वरूपात कशा प्रकारे करता येईल, याबाबत तांत्रिक व प्रशासकीय स्तरावर नियोजन करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी नागरिकांना दिले.

महापौरांनी सांगितले की, नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देऊन या विषयाचा सकारात्मक विचार करण्यात येईल तसेच संबंधित विभागाकडून आवश्यक अहवाल मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. यावेळी नगरसेवक प्रथमेश दादा कोठे, माजी नगरसेवक राजकुमार हांचाटे उपअभियंता प्रकाश दिवाणजी तसेच मुद्रा सन सिटी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानज्योती ग्रामीण अभिवृध्दी संस्था व आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने गरिबांना अत्यावश्यक किट वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- संपुर्ण महाराष्ट्रात उन्हाची तापमानात वाढ होत असून हे तडाका लक्षात घेऊन रणरणत्या उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी सामाजिक कामात अग्रेसर असणारी आस्था सामाजिक संस्था व ज्ञानज्योती ग्रामीण अभीवृद्धी ( बेळगावी) संस्थेच्या वतीने सोलापूरातील 100 वंचित,बेघर,निराधार, गरीबांना हॅन्ड वॉश वाटिका तेल, टूथपेस्ट साबण, गुलकोप्लस एनर्जी सॉफ्ट ड्रिंक, दंतमंजन किट वाटप करण.यात आले तसेच ,



स्वच्छतेबाबती व आरोग्याच्या बाबतीत देखील मार्गदर्शन करण्यात आले.

या किट वाटप प्रसंगी कैलास शिरसी ( समन्वयक ज्ञानज्योती फाउंडेशनचे) , विजयकुमार बिराजदार (अध्यक्ष वीरशैव व्हिजन समितीचे) आनंद तालिकोटी ( अध्यक्ष आस्था सामाजिक सस्था) सुहास छंचुरे ( प्रसिद्धी प्रमुख आस्था सामाजिक सस्था) यांची प्रमुख उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेदांत तालिकोटी, पिंटू कस्तुरे सुरज छंचुरे, यांनी परिश्रम घेतले.

आस्था सामाजिक संस्था गेल्या दहा वषार्पासून रोज वंचित गरीब बेघर, निराधार यांना अविरतपणे मोफत अन्नदान करण्याचे काम करते तरी सोलापूरात कुठेही कोणत्याही कार्यक्रमांमध्ये किंवा घरामध्ये अन्न शिल्लक राहिल्यास असल्यास तर आमच्या संस्थेची संपर्क साधावे.

# कुमार खोखो पटूंनी वैभव सूर्यवंशीचा आदर्श घ्यावा- दिलीप माने

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त)**:- क्रिकेटपटू वैभव सूर्यवंशी याने इतक्या कमी वयात आपले सातत्य टिकवून आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या उत्कृष्ट फलंदाजीने मोठी कामगिरी करून आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्याप्रमाणे राज्यातून आलेल्या कुमार खो-खो पटूंनी देखील त्याचाच आदर्श घेऊन या स्पर्धेत आपले सर्वोत्कृष्ट योगदान द्यावे, असा सल्ला माजी आमदार दिलीप माने यांनी खेळाडूंना दिला.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२ व्या कुमार व मुली गटाच्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उद्घाटन मंगळवारी नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर (स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरी) झाले. या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे होते.



**राज्य स्पर्धांसाठी आता 'रॉयल्टी' नाही**

यापसंगी महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी एक महत्त्वाची घोषणा केली. संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ, महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यापुढे राज्यस्तरीय स्पर्धा आयोजनासाठी कोणत्याही जिल्हा संघटनेकडून किंवा आयोजक संस्थेकडून 'रॉयल्टी' घेणार नाही, असे त्यांनी जाहीर केले. तसेच, या स्पर्धेतून निवडले जाणारे महाराष्ट्राचे दोन्ही संघ हिमाचल प्रदेशात होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत राज्याची मान उंचावतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सुरुवातीला किरण स्पोर्ट्सच्या अध्यक्षा अलकाताई राठोड, नागेश बिराजदार, मोहन रजपूत व शिवशंकर राठोड यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

या सोहळ्याला महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार गोविंद शर्मा, सहसचिव, डॉ. राजेश सोनवणे, डॉ. पवन पाटील, डॉ. प्रशांत इनामदार, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, डॉ. बापूसाहेब अडसूळ, नगरसेविका अश्विनी चव्हाण, डॉ. अरुण मनगोळी, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, अजितकुमार संगवे, सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव राजाराम शितोळे, अजित शिंदे आणि संतोष कदम आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य अंबादास पांढरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन मिसाळ यांनी केले, तर श्रीकृष्ण कोळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**राजकारणी आणि खेळाडूंच्या प्रामाणिकपणावर भाष्य**

सोलापूरची राष्ट्रीय खो-खो पटू स्नेहा लामकाने हिने उपस्थित खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. या शपथविधीचा संदर्भ देत दिलीप माने पुढे म्हणाले, "खेळाडू हा नेहमी प्रामाणिकपणे आपण घेतलेल्या शपथेचे पालन करतो आणि खेळाडूवृत्ती जपतो. मात्र, आम्ही राजकारणी लोक त्याप्रमाणे आचरण करत नाही," अशी प्रांजळ कबुलीही त्यांनी यावेळी दिली.

# पर्यावरण दिनादिवशीच वादळाने वृक्ष साम्राज्यावर घाला घातला



**अकलूज (विलास गायकवाड)**:- सर्वत्र जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा होत असताना, अकलूजसह माळशिरस तालुक्यातील विविध भागात पर्यावरण दिनादिवशीच, वृक्ष साम्राज्यावर धडकी भरवणाऱ्या वादळाने घाला घातला असून, काही क्षण अकलूज मधील जनजीवन विस्कळीत झाले होते. भयावह वादळामुळे अकलूजकरांचे मन सुन्न झाले होते.

शुक्रवार दिनांक 05.06.2026 रोजी, मोठ्या उत्साहामध्ये जागतिक पर्यावरण दिन, सर्वत्र साजरा करण्यात आला. अकलूज मध्ये अगदी सकाळ पासूनच सूर्याच्या प्रखरदाहकतेची कमकरता जाणवत होती. काही क्षण अचानक ढगाळ वातावरण तयार होत होते तर अचानक ऊन पडत होते. दिवसभराचे वातावरण पाहता, नक्कीच मन सुखावणारी पर्जन्यवृष्टी होईल असे वाटत होते. परंतु सायंकाळी पाच साडेपाचच्या दरम्यान, अचानक भयानक वादळ आले आणि कहरच करून गेले. काही क्षणातच त्याने अकलूजचे हिरवे साम्राज्य उध्वस्त केले. याबरोबरच, वीज पुरवठा करणाऱ्या तारेवरती वृक्षांच्या फांद्या तुटून पडल्यामुळे, वीज पुरवठा करणाऱ्या तारा, रस्त्यांवरती लोळत पडलेल्या होत्या. काही टपरी धारकांच्या टपरीवरती, दुकानांवरती, वृक्षांच्या फांद्या तुटून पडल्यामुळे काही प्रमाणात त्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनात आले. जागतिक पर्यावरण दिनादिवशीच निसगार्चा आगळा वेगळा चमत्कार जनतेला पाहायला मिळाला

# पांढरेवाडीत 'खेत बचाओ अभियान' उत्साहात संपन्न



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त)**:- 'खेत बचाओ अभियान' अंतर्गत मौजे पांढरेवाडी (ता. पंढरपूर) येथे शेतकऱ्यांसाठी विशेष मार्गदर्शन आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १ ते १५ जून २०२६ या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या या अभियानांतर्गत कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांधावर जाऊन मार्गदर्शन केले.कार्यक्रमात मुख्य शास्त्रज्ञ डॉ. तानाजी वळकुंडे (कृषी विज्ञान केंद्र, मोहोळ) यांनी क्षेत्रीय प्रात्यक्षिकांद्वारे नैसर्गिक शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जाईल असे सांगितले. डॉ. स्वाती कदम यांनी मातीचे आरोग्य सुधारणे आणि रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी शेतीतील निविष्ठांचा योग्य वापर, हिरवळीच्या खतांचा वापर आणि एकात्मिक पोषण व्यवस्थापन (INM) याविषयी शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष प्रात्यक्षिके सादर केली. तसेच माती परीक्षण करून संतुलित खत वापराबाबत जागृती निर्माण केली.डॉ. पंकज मडावी यांनी संतुलित व हिरवळीच्या खतांच्या वापराचे महत्त्व पटवून दिले, तर दिनेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांनी उद्योजक व्हावे या बद्दल शेतकऱ्यांना प्रशिक्षित करून त्यांची क्षमता वाढवण्यावर भर दिला.या प्रसंगी करकंबचे मंडळ कृषी अधिकारी सुहास यादव, उपकृषी अधिकारी सतीश कचरे, सहाय्यक कृषी अधिकारी प्रमोद डोके, योगेश पवार तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक व वैभव माने, महेश फुले सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक, आजी-माजी सरपंच, शेतकरी उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी, शेतकरी स्वयंसहाय्यता गट आणि परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शक्तीपीठ महामार्ग मोजणी दरम्यान निमगावमध्ये ड्रामा

## एकीकडे विरोध तर दुसरीकडे समर्थन

**निमगाव (कटूसत्य वृत्त)**:- शक्तीपीठ महामार्गाच्या जमीन मोजणीसाठी आलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना आज निमगाव (ता. माळशिरस) येथे शेतकऱ्यांच्या विरोधाचा सामना करावा लागला. मोठ्या पोलीस फौजफाट्यासह आलेल्या प्रशासनाने गावात वेगवेगळ्या ठिकाणी मोजणी करण्याचा केली. यामध्ये काही ठिकाणची मोजणी झाली तर काही ठिकाणची शेतकऱ्यांच्या विरोधामुळे थांबवण्यात आली आहे मात्र, काही ठिकाणी शेतकऱ्यांनी थेट अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा, प्रयत्न केल्याने परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.



शुक्रवारी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास मोजणी अधिकारी आणि पोलिसांचा मोठा ताफा निमगावमध्ये दाखल झाला. प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार आणि वेळापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कांबळे, नातेपुतेचे सपोनी विशाल वायकर हे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले.

मोजणी थांबवण्यासाठी उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. यावेळी शेतकरी नेते आणि उपस्थित शेतकऱ्यांनी महामार्ग आणि भूसंपादनाबाबत प्रांताधिकारी व तहसीलदार यांना विविध कायदेशीर व तांत्रिक प्रश्न विचारले..प्रशासनाने मोजणी सुरू करून बहुतांश ठिकाणचे मोजणी पूर्ण केली असल्याची माहिती मिळत आहे. उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनापुढे अनेक प्रश्न उपस्थित केले त्यांचे प्रश्न पाहता प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन करणारे एक लेखी पत्रही दिले. निमगाव मध्ये ग्राउंड कंट्रोल पॉईंट च्या वेळी काही शेतकरी विरोध करीत होते तरी काही शेतकऱ्यांनी या अगोदरच शक्तीपीठ महामार्गाच्या समर्थनाचे पत्र प्रांताधिकार्यांकडे सुपूर्द केले आहे यामुळे काही ठिकाणी विरोध होत आहे तर याच गावात दुसरीकडे शेतकऱ्यांचे शक्तिपीठ महामार्गाला समर्थनही मिळत आहे.

> निमगावात ग्राउंड कंट्रोल पॉईंट घेत असताना काही लोकांनी विरोध केला पण या अगोदर याच गावातील जवळपास ८० टक्के शेतकऱ्यांनी आपल्या समर्थनाचे निवेदन प्रांत अधिकाऱ्यांना दिले आहे यामुळे निमगावात या महामार्गास विरोध आहे असे चित्र जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे परंतु वस्तुस्थिती शक्तिपीठ महामार्ग समर्थनाची आहे
>
> **- किरण पाटील,**
> ग्रा सदस्य निमगाव

# राजश्री चव्हाण यांचा एकच ध्यास प्रभाग २६ चा सर्वांगीण विकास

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- गेल्या अनेक दिवसापासून प्रभाग 26 मधील अनेक नगरे उदा. गुरुदेव दत्त १ ते ५, शिक्षक सोसायटी, हेरिटेज फॉर्म, रोहिणी नगर भाग १ व २, ओम गर्जना चौक, द्वारका नगर,उद्धव नगर, या नगरातील नागरिकांना डी मार्ट, आय एम एस कॉलेज, आसरा चौक, कडे जाण्यासाठी ओम गर्जना चौकाकडून वळसा मारून जावे लागत होते. त्या भागातील नागरिकांनी कृष्णा कॉलनी मधून जाणारा डांबरी रोड ड्रेनेज कामामुळे खोदून ठेवला होता तो दुरुस्त करून डांबरीकरण झाल्यास सर्वसामान्य नागरिक,महिला वर्ग,ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थीसाठी ने आण करणारे स्कूल बस यांना सोयीचे होणार होते.

परंतु सदरचा रस्ता उखडला गेल्याने नागरिकांना त्रास होत होता. ही बाब त्या नगरातील नागरिकांनी कर्तव्यदक्ष माजी नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिल्याने. तातडीने ही बाब सोलापूर महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, महापौर विनायक कोंड्याल, सभागृह नेते नरेंद्र काळे, यांना लेखी निवेदन देण्यात आले होते. सदर जोडणारा रस्ता पावसाळ्यापूर्वी करण्यात यावा म्हणून समक्ष कळविले होते त्याची दखल घेऊन लगेच लक्ष्मी कंट्रक्शन कडून कृष्णा कॉलनी मधील रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली व डांबरीकरण करण्यात आले तसेच दोन ५ कार्यालय कडून ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर झाडी झुडपी वाढली होती ती काढण्यात आली आणि ज्या ठिकाणी पावसामुळे चिखल होत होते तेथे मुरूम टाकून रोलिंग करण्यात आली



त्यामुळे वरील नगरातील ज्येष्ठ नागरिक,महिला वर्ग, विद्यार्थी व स्कूल बस चालवणारे चालक यांनी सुटकेचा निस्वास सोडला असून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले की आम्ही वारंवार सदर समस्या बाबत सोलापूर महानगरपालिका, झोन कार्यालय, व नव्याने निवडून गेलेले नगरसेवक यांना व्यथा सांगून ही मनावर घेत नव्हते परंतु माजी नगरसेविका सौ राजश्री चव्हाण यांना केवळ फोनद्वारे सदर समस्या सांगितल्यानंतर समक्ष पाठपुरावा करून सोलापूर महानगरपालिका आयुक्त, महापौर, सभागृह नेता, यांच्याकडे यशस्वी पाठपुरावा केल्यामुळे आमच्या समस्या दूर झाल्या आहेत तसेच ओम गर्जना चौक ते बॉम्बे पार्क पर्यंतचा रस्ता ड्रेनेजसाठी खोदून ठेवला आहे तो व्यवस्थित करून द्यावा एवढी एक बिकट समस्या आहे ते ही माजी नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण ह्याच करू शकतात असे मनोगत व्यक्त केले. व यशस्वी पाठपुरावा करून समस्या सोडवल्याबद्दल मनापासून आभार मानले.

सदर समस्यासाठी झोन ५ कार्यालयाला कडील मुकादम बाळासाहेब गोतसुर्वे, देशमुख, कट्टीमणी, लोंढे, यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

# अन्नछत्र मंडळात सचिव शामराव मोरे यांचा वाढदिवस साजरा

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त)**:- श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून संस्थेचे सचिव शामराव मोरे काका यांच्या ७४ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात महाप्रसादालयात साजरा करण्यात आला.

दरम्यान सचिव शामराव मोरे काका यांच्या ७४ वा वाढदिवसा निमित्त कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची रेखीव व सुंदर प्रतिमा, कृपावस्त्र देऊन सत्कार करण्यात आला.



**जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराजांची सावली-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी ३८ वषार्पूर्वी संस्थेची स्थापना केली. त्यावेळेस पासून शामराव मोरे काका हे मंडळात कार्यरत असून, जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज हे नेहमी मोरे काकांची ओळख सांगत असतांना माझी सावली असल्याचे सांगतात. एक निस्सीम स्वामी भक्त व कार्यमग्न नेतृत्व म्हणून मोरे काकांकडे पाहिले जाते

याप्रसंगी न्यासाचे विश्वस्त भाऊ कापसे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाबुशा महिंद्रकर मनोज निकम, शहाजी यादव, सौरभ मोरे, दत्ता मोरे, वैभव मोरे, अतिश पवार, प्रवीण घाटगे, निखील पाटील, दत्ता माने, बालाजी कटारे, स्वामिनाथ बाबर, रोहन शिर्के, श्री चव्हाण, बुद्धाराम बिष्णोई, मुन्ना कोल्हे, पप्पू कोल्हे, दत्ता वाघमारे, नुरदिन खासबागदार, प्रमोद स्वामी, शरणप्पा कुंभार, मल्लिकार्जुन बिराजदार, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, गोरख माळी, गणेश पाटील, बसू क्यार, शुभम सावंत, विशाल घाटगे, बाळासाहेब घाटगे, बाळासाहेब पोळ, लक्ष्मण निंबाळ, सादिक बागवान, एम. एम. मकानदार, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, राजू पवार, तानाजी पाटील, विराज माणिकशेट्टी, शंकर पवार, दरेप्पा जकापुरे, अप्पा हंचाटे, सागर हळगोदे, किरण साठे, नितीन गुब्बीन, राहुल इंडे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, श्रीमंत जमादार यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

अनेक मान्यवरांनी भ्रमणध्वनीच्या माध्यमातून सचिव शामराव मोरे काका यांच्या ७४ वा वाढदिवसा निमित्त शुभेच्छा दिले.

# समाधान समारोह 2026, सर्वोच्च न्यायालयातील विशेष लोक अदालत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- "न्यायप्रक्रियेत सहभाग" आणि "न्याय आपल्या दारी" या संकल्पनेला मुर्त रूप देण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने "समाधान समारोह" या उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमाचा दिनांक 21 एप्रिल, 2026 पासून प्रारंभ झालेला असून दिनांक 21, 22 आणि 23 ऑगस्ट 2026 रोजी विशेष लोक अदालतीमध्ये समारोप होणार आहे.

या लोकअदालतीमध्ये सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तडजोडीसाठी ठेवली जाणार आहेत. जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यास व ती तडजोडीने मिटावीत, अशी ज्यांची इच्छा असेल ती प्रकरणे विशेष लोकअदालतीमध्ये ठेवता येउ शकतात. उपरोक्त लोकअदालतीमध्ये पक्षकार प्रत्यक्ष किंवा आभासी पध्दतीने सहभागी होउ शकतात. जिल्हयातील प्रकरणे सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष लोकअदालतीमध्ये ठेवण्यासाठी संबंधित विधीज्ञांना कल्पना द्यावी किंवा अधिक माहितीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर किंवा तालुका विधी सेवा समिती यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुनिल शिंदे यांनी केले आहे.

लोकअदालतीचा फायदा- साध्या व सोप्या पध्दतीने वाद मिटवता येतो झालेल्या तडजोडीच्या निवाडा अंतिम व अंमलबजावणी होउ शकणार असतो. वेळेची व पैशाची बचत होते. तडजोड झाल्यास न्यायालयीन शुल्क परत मिळते.